पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या आस्थापनेवरील अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयातील "लघुलेखक (उच्चश्रेणी), लघुलेखक (निम्नश्रेणी) व प्रयोगशाळा तंत्रज्ञ" संवर्ग मृत संवर्ग म्हणून घोषित करणेबाबत...

महाराष्ट्र शासन

पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन ज्ञापन क्र. DAHD-११०११/१०७/२०२६-DAHD-AH१ (१७६५२४७),
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २३ जुलै, २०२६.

<u>वाचा:-</u>

१. या विभागाचा, शासन निर्णय क्र.पसंप्र-२०२४/प्र.क्र.०१/पदुम-१, दि.१०.१०.२०२४.
२. सामान्य प्रशास विभाग, शासन निर्णय क्र. प्रानिमं १२२४/प्र.क्र.७०/सेवा-४ (का.१३ अ), दि.०५.०५.२०२६.

<u>प्रस्तावना:-</u>

सामान्य प्रशासन विभागामार्फत "किमान शासन आणि कमाल प्रशासन" (Minimum Government and Maximum Governance) या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी पारदर्शक, भविष्योन्मुख आणि नागरिक-केंद्रित मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने पदभरती प्रक्रियेत आमूलाग्र सुधारणा करणे, भरती प्रक्रिया सुलभ करणे याकरीता विविध प्रशासकीय विभागांच्या सर्व संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमांचा अभ्यास करण्यात आला. त्यामध्ये प्रशासनिक कामकाजात, शासकीय व्यवहारात माहिती-तंत्रज्ञान कार्यप्रणालीचा मोठ्या प्रमाणावर वापर वाढलेला असल्याने, प्रशासकीय पुनर्रचना, आधुनिक तंत्रज्ञान या पार्श्वभूमीवर काही संवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या कालबाह्य ठरल्या असल्याने, त्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय दृष्ट्या अनावश्यक ठरलेल्या संवर्गांना "मृत संवर्ग" म्हणून घोषित केले असून याबाबत प्रशासकीय विभागांनी आवश्यक कार्यवाही करण्यासंदर्भात निर्देशित केले आहे. त्याप्रमाणे पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या आस्थापनेवरील अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयातील **"लघुलेखक (उच्चश्रेणी), लघुलेखक (निम्नश्रेणी) व प्रयोगशाळा तंत्रज्ञ"** संवर्ग मृत संवर्ग म्हणून घोषित करण्याची बाब विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या आस्थापनेवरील अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयातील संवर्गांचा सुधारित आकृतीबंध दि.१०.१०.२०२४ रोजी मंजूर करण्यात आलेला आहे. सदरहू आकृतीबंधामध्ये समाविष्ट पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या आस्थापनेवरील खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेले **"लघुलेखक (उच्चश्रेणी), लघुलेखक (निम्नश्रेणी) व प्रयोगशाळा तंत्रज्ञ"** या संवर्गांना **"मृत संवर्ग"** म्हणून घोषित करण्यात येत आहे.

अ.क्र.	संवर्गाचे नाव	गट	वेतनश्रेणी	पदसंख्या
१.	लघुलेखक (उच्चश्रेणी)	क	एस-१६ रु.४४९००-१४२४००	३
२.	लघुलेखक (निम्नश्रेणी)	क	एस-१५ रु.४१८००-१३२३००	७
३.	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	क	एस-१३ रु.३५४००-११२४००	३९१

२. पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या आस्थापनेवरील **“लघुलेखक (उच्चश्रेणी), लघुलेखक (निम्नश्रेणी) व प्रयोगशाळा तंत्रज्ञ”** या संवर्गामध्ये कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचे सेवा विषयक लाभ अबाधित राहतील.

३. पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या आस्थापनेवरील आकृतीबंधाच्या शासन निर्णयामध्ये “मृत संवर्ग” घोषित केल्याच्या अनुषंगिक सुधारणा यथावकाश करण्यात येतील.

४. सदर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या भरतीप्रक्रिया सुलभ करण्यासंबंधीच्या प्रस्तावास मा.मंत्रीमंडळाने दिलेल्या दि.१३.०४.२०२६ रोजीच्या मान्यतेस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक **२०२६०७२३१४३४१४३६४५** असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

MARALE NIWRUTTI BHAGUJI

Digitally signed by MARALE NIWRUTTI BHAGUJI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept,
2.5.4.20=8A75C414FF50CE35220C63CD53D2EB1A99A474C02300BEEA74BB051C4C3C90A9, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=5C891DA87D2A4842558454524CC114BA5B2F67A2A80796592830D345500F15CC, cn=MARALE NIWRUTTI BHAGUJI
Date: 2026.07.23 14:35:10 +05'30'

(नि. भा. मराळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सचिव, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त, पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. सर्व प्रादेशिक सहआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय (आयुक्त, पशुसंवर्धन यांच्यामार्फत).
४. कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. कक्ष अधिकारी (सेवा-४), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
८. महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
९. महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१०.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
११.निवडनस्ती/पदुम-१